# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर- २१८/२०२४

**अपिलार्थी, श्री.नितीन देशमुख**
००१, सावित्री आवास,
मोहनानंद नगर, मांजर्ली,
बदलापूर (प), जि.ठाणे ४२१ ५०३.

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, नांदगाव,
ता.मुरबाड, जि.ठाणे.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी
पंचायत समिती कार्यालय मुरबाड,
ता.मुरबाड, जि.ठाणे ४२१ ४०१.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १०.०६.२०२४**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २१.०४.२०२३ | -- | २०.०६.२०२३ | -- |

अपिलार्थी यांनी दि. १२.०१.२०४ रोजीच्या अर्जान्वये *" माहिती अधिकारी यांनी उत्तर दिलेले नाही. "* असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १०.०६.२०२४ रोजी सुनावणी घेण्यांत आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.आनंद वामन मुरेकर, विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती कार्यालय, मुरबाड, ता.मुरबाड उपस्थित आहेत. तसेच तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.यासीन इस्माईल शेख, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, नांदगाव, ता.मुरबाड उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*"दि.०१ एप्रिल २०१७ ते दि.२१.०४.२०२३ या कालावधीतील प्रतिवर्षी ऑडिट रिपोर्टच्या प्रति नमुना २७ लेखा परीक्षणातील आक्षेपाच्या पूर्ततेच्या मासिक विवरण नोंदवही नमुना ३० ग्रामपंचायत लेखा परीक्षण आक्षेप पूर्तता नोंदवही."*

सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी सांगितले की, त्यांची तब्येत ठीक नसल्याने ते अपिलार्थी यांना माहिती देऊ शकले नाही. आता माहिती देण्यात येईल.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच उभयपक्षांचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती दिलेली नाही. वास्तविक जन माहिती अधिकारी यांनी या अधिनियमाच्या कलम ७(१) अन्वये ३० दिवसांत माहिती पुरविणे अथवा नाकारणे आवश्यक आहे. परंतु, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही. तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दि.१३.१०.२०२३ अपिलार्थी यांना माहिती पुरविण्याचे आदेश पारित केले होते. सदर आदेशानंतरही माहिती दिलेली नाही. यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये माहिती पुरविण्यासाठी झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे.

तसेच, आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती पुरविणे योग्य होईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, नांदगाव, ता.मुरबाड यांनी **अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसात समक्ष/ नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, नांदगाव, ता.मुरबाड यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक २१.०४.२०२३ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी दि.०५.०८.२०२४ रोजीच्या सुनावणीच्या वेळी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.०५.०८.२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता घेण्यता येईल.

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १० जून , २०२४ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, नांदगाव,
ता.मुरबाड, जि.ठाणे.